रयत शिक्षण संस्थेचे,

# सदगुरू गाडगे महाराज कॉलेज कराड

(स्वायत्ता महाविद्यालय)

## अर्थशास्त्र विभाग

## अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत आयोजित एकदिवसीय कार्यशाळा

## विषय - "सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे ग्रामीण विकासातील योगदान"

## (२०२२-२३)

## अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे, सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा शुक्रवार दिनांक-१०/०२/२०२३ रोजी आयोजित केली होती. कार्यशाळेचा विषय "सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे ग्रामीण विकासातील योगदान" हा होता. सदर कार्यशाळेस प्रमुख वक्ते म्हणून डॉ. आर. के. निलोलू धनंजयराव गाडगीळ कॉलेज, सातारा लाभले होते. डॉ. आर. के. निलोलूनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या विकासाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये नवनवीन रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या दिसून येत आहेत. त्या माध्यमातून व्यक्तीचा आर्थिक सामाजिक स्तर वाढवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. मोहन राजमाने साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत मध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचा विकास झाला तरच ग्रामीण विकासास चालना मिळेल असे मत मांडले.

सदर कार्यक्रमास अग्रणी महाविद्यालय अंतर्गत महिला कॉलेज, कराड, वेणूताई महाविद्यालय, कराड, बापूजी साळुंखे कॉलेज कराड इत्यादी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमास एकूण १४५ विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. के. पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. जी. एस. बनसोडे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. निशिगंधा बनसोडे यांनी केले. सदर कार्यक्रमास प्रा. एन.यू.खोत, प्रा. ए. व्ही. जाधव आणि प्रा. शीतल माने यांनी उपस्थिती दर्शविली.

Head
Department of Economics
S.G.M. College, Karad

Scanned with OKEN Scanner